क्रमांक : ८२७१ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : १२ मे, २०२६

**संदर्भ :- या सचिवालयाचे कार्यालयीन आदेश क्र.६६३२/क-१ दि. २४ एप्रिल, २०२५**
**उपरोक्त संदर्भाधीन आदेश अधिक्रमित करण्यात येऊन सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे.**

**: : ज्ञापन : :**

मा.पिठासीन अधिकारी, मा.विरोधी पक्षनेते व विधीमंडळाचे सन्माननीय सदस्य यांचे वेतन व भत्त्यासंदर्भातील देयके त्याचप्रमाणे त्यांच्या स्वीय सहायकांचे वेतन / पारिश्रमिकांची देयके महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या देयकाप्रमाणे (महाराष्ट्र कोषागार नियम १९ नमुना) एकत्रितरित्या अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे दाखल केली जातात. सदर देयके अधिदान व लेखा कार्यालयाकडून पारित करुन सदर रक्कम प्रथम ECS द्वारे विधानमंडळ सदस्यांच्या वेतन व भत्ते याकरीता नियुक्त केलेल्या महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्यात जमा करुन सदर रक्कम थेट संबंधितांच्या बँक खात्यात NEFT/ECS पद्धतीद्वारे जमा करण्यात येणार आहे. उक्त प्रक्रिया व्यवस्थितरित्या पार पाडण्याकरिता या सचिवालयातील श्रीमती सुषमा पाठक, अवर सचिव (समिती) ह्या **"आहरण व संवितरण अधिकारी"** म्हणून काम पाहतील.

आदेशानुसार,
मोहन काकड
**(मोहन काकड)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

श्रीमती सुषमा पाठक, अवर सचिव (समिती)

**प्रतिलिपी :-**

१) मा.सचिव -२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
२) मा.सचिव -३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
३) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी (श्रीमती ताडफळे), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
४) 'ह' (विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतने) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
५) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
६) वैयक्तिक नस्ती
७) निवडनस्ती

\\mls-dataserver\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2026\Employee Demand\order.doc